NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक २३.११.२०२६ सोमवार

'प्रहार' क्रिकेट टर्फ ग्राऊंडचे उद्घाटन तथा 'पोलीस फिटनेस सेंटर' नुतणीकरण समारंभ उत्साहात संपन्न :–

मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन नागपुर शहर पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांच्या क्रिडा आणि शारीरिक तंदुरूस्तीला चालना देण्याच्या उद्देशाने, सि.आय.डी. कार्यालयाच्या बाजुला 'प्रहार' क्रिकेट टर्फ ची निर्मीती करण्यात आली. तसेच, पोलीस मुख्यालय परीसरातील 'पोलीस फिटनेस सेंटर' चे नुतणीकरण करून पुनरूज्जीवीत करण्यात आले.

'प्रहार' क्रिकेट टर्फ ग्राऊंडचे उद्घाटन तथा 'पोलीस फिटनेस सेंटर' नुतणीकरण समारंभ दिनांक २३.११.२०२६ रोजी १७.०० वा. ते १८.०० वा. चे दरम्यान आयोजीत करण्यात आला होता. समारंभास प्रमुख पाहुणे म्हणुन मा. महाराष्ट्र राज्याचे महसुल मंत्री तथा नागपुर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. चंद्रशेखरजी बावणकुळे लाभले होते. सुरूवातीला सि.आय.डी. कार्यालयाचे बाजुला उभारलेले 'प्रहार क्रिकेट टर्फ' चे उद्घाटन १७.०० चे सुमारास, मा. प्रमुख पाहुण्यांचे हस्ते करण्यात आले. तद्नंतर १८.०० वा. चे सुमारास, पोलीस मुख्यालय, नागपुर शहर परिसरातील 'पोलीस फिटनेस सेंटर' चा नुतणीकरण समारंभ सुध्दा मा. प्रमुख पाहुण्यांचे हस्ते दिप प्रज्वलन करून पार पडला. समारंभप्रसंगी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. विनिता शाहु (उत्तर प्रभाग), श्री. राजेंद्र दाभाडे (गुन्हे), नागपुर शहर उपस्थीत होते.

कार्यक्रम प्रसंगी मा. प्रमुख पाहुण्यांचे हस्ते क्रिकेट खेळणाऱ्या १० ते १२ वर्षीय चिमुकल्या खेळाडुंना क्रिकेटची किट सुध्दा प्रदान करण्यात आली. या उपक्रमामुळे पोलीस अधिकारी व अंमलदारांना क्रिकेट या खेळाच्या माध्यमातुन आपले क्रिडा कौशल्य विकसित करण्यास तसेच, आधुनिक उपकरण व सुविधांनी सुसज्ज फिटनेस सेंटरच्या माध्यमातुन शारीरिक तंदुरूस्ती राखण्यास मोलाचे प्रोत्साहन मिळणार आहे. सुदृढ शरीर, निरोगी मन आणि शारीरिक क्षमता हे प्रभावी पोलीस कार्यप्रणालीचे महत्वपुर्ण आधारस्तंभ आहेत, या दृष्टीकोनातुन नागपुर शहर पोलीस दलाकडुन पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या निरोगी आरोग्य, उत्तम शारीरिक क्षमता आणि क्रिडा संस्कृतीला चालना देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला आहे. नमुद कार्यक्रमाचे आयोजन मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंह पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) यांचे वतीने व विशेष मार्गदर्शनात करण्यात आले.

कार्यक्रमाकरीता मा. ना. श्री. चंद्रशेखरजी बावणकुळे, महाराष्ट्र राज्याचे महसुल मंत्री तथा नागपुर जिल्ह्याचे पालकमंत्री, मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. अपर पोलीस आयुक्त श्रीमती विनिता शाहु (उत्तर प्रभाग), श्री. राजेंद्र दाभाडे (गुन्हे), मा. पोलीस उप आयुक्त श्री. दीपक अग्रवाल (डिटेक्शन), श्रीमती अन्नपुर्णा सिंह (मुख्यालय), श्रीमती महक स्वामी (आर्थिक गुन्हे), श्री. नित्यानंद झा (परि.क्र. ५), श्री. राहुल माकणीकर (परि.क्र. २), श्री. राहुल मदने (परि.क्र. ३), श्री. रमेश धुमाळ (परि.क्र. ६), सर्व मा. सहा. पोलीस आयुक्त, सर्व मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक तसेच, ईतर पोलीस अधिकारी, कर्मचारी व त्यांचे परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.








(गुन्हे)

१) पोलीस ठाणे वाडी:—शस्त्र बाळगुण धुमाकुळ करणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक २३.०११.२०२६ चे ०१.२५ वा. चे सुमारास, वाडी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, सुराबर्डी, स्वामी समर्थ मंदीराजवळ, वाडी येथे एक इसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी तलवार काढुन घेतली. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव राजकुमार शंकरराव पेंदाम वय ४९ वर्षे रा. सुराबर्डी झोपडपट्टी, वाडी नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी तलवार किंमती ५००/— रू. ची जप्त करण्यात आली.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने तलवार घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा सुरेश चन्ने यांनी दिलेल्या

तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि. सानप यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे गणेशपेठ :– फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.

फिर्यादी सुर्यकांत उध्दवप्रसाद शुक्ला, वय ३८ वर्षे, रा. फ्लॅट नं. १, देवि अपार्टमेंट, गणेश मंदीर जवळ, साकेत नगर, नागपूर यांचे मित्राचे माध्यमातुन त्यांची ओळख आरोपी क्र. १) संदीप कुशलराव पोटे, वय ४८ वर्षे, रा. सिंघाडा मार्केट, दसरा रोड, महाल, नागपुर यांचेसोबत झाली होती. आरोपीने तो पदविधर महीला अर्बन क्रेडीट को–ऑपरेटीव्ह सोसायटी तथा संचीता अर्बन निधी लिमी. या दोन्ही पतसंस्थेचा मुख्य कार्यकारी अधिकारी असुन त्याची पत्नी आरोपी क्र. २) सौ. ममता संदीप पोटे, वय ४४ वर्षे ही पतसंस्थेची अध्यक्ष आहे, असे सांगीतले. त्यांचे संस्थेचे कार्यालय गडेकर भवन, घर नं. ७५, गांधीगेट, महाल, नागपुर येथे आहे. त्यांची पतसंस्था एफ.डी व आर.डी स्वरूपात जमा रकमेवर ९–११ टक्के व्याजदराने नफा देत असल्याचे सांगीतले. फिर्यादीचा विश्वास बसल्याने तसेच, त्यांचे मित्र व ईतर परीचीत यांनीसुध्दा तेथे रक्कम गुंतवणुक करून, त्यावर व्याज स्वरूपात नफा घेतले असल्याने फिर्यादी यांनी त्यांचे व पत्नीचे नावे वेगवेगळ्या कालावधी करीता वेगवेगळ्या रक्कमा असे एकुण ८,५०,०००/–रू. एफ.डी स्वरूपात जमा केले होते. एफ.डी चा कालावधी समाप्त झाल्याने फिर्यादी पतसंस्थेच्या कार्यालयात गेले असता, तेथे त्यांना माहीती मिळाली की, पतसंस्थेत रक्कम उपलब्ध नाही व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आरोपी क्र. १ व अध्यक्ष आरोपी क्र. २ हे दोघेही कार्यालयात येत नाहीत. अधिक माहीती काढली असता, आरोपी क्र. १ व २ तसेच, पतसंस्थेचे ईतर पदाधिकारी आरोपी क्र. ३) निता राजु सातपुते, उपाध्यक्ष ४) जया जितेंद्र गडेकर, सचिव, ५) सविता गणपतराव अंबाडकर, संचालक, ६) माधुरी राजु बावणकर, संचालक, ७) जयश्री प्रविण वाघमारे, संचालक, ८) मिनल नितीन नागपुरे, संचालक, ९) निता भोजराज गायकवाड, संचालक, १०) मनिषा कैलास श्रीराव, संचालक, ११) दिपाली धनराज गोणे, संचालक, १२) पुजा देवेंद्र पाटील, संचालक, १३) जितेंद्र कैलासराव गडेकर, सल्लागार, १४) भोजराज दाजीबा गायकवाड, सल्लागार यांनी संगणमत करून दिनांक २२.१२.२०२३ ते दिनांक २२.११.२०२६ चे दरम्यान, पतसंस्थेमध्ये फिर्यादी यांनी त्यांची जमा केलेली मुदतठेव ८,५०,०००/–रू. तसेच, ईतर ५८ निवेशक यांचेकडुन मुदतठेव व दरमहा ठेवी असे एकुण २,६५,३८,७८५/–रू. स्विकारून ठेवीदारांना मुदत पुर्ण झाल्यावर कोण्तीही परतफेड न करता, त्या रक्कमांचा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता वापर करून, ठेवीदारांचा अन्यायाने विश्वासघात करुन त्यांची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे सपोनि. जितेंद्र गाडगे ८८३०८००८१० यांनी आरोपींविरूध्द कलम ३१८(२),३१८(३),३१८(४),३१६(५),३(५) भा.न्या.सं., सहकलम ३ महा. ठेविदारांच्या (वित्तीय संस्थांमधील हितसंबंधांचे संरक्षण) अधिनियम– १९९९ (एम. पि.आय.डी ॲक्ट) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे सोनेगांव :– घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २२.११.२०२६ चे १५.०० वा. ते २०.४५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे सोनेगांव हद्दीत केशव सहनिवास अपार्टमेंट, फ्लॅट नं. १०१, राजीव नगर, सोनेगांव, नागपूर येथे राहणारे फिर्यादी मयुर मुकुंद शेटे, वय ३० वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह त्यांचे मावशीचे घरी कार्यक्रमाकरिता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख १,५०,०००/–रू. तसेच, सोन्या–चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती २,४२,५००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सोनेगांव येथे पोउपनि. राजेश राठोड यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(मिसींग)

पोलीस ठाणे नविन कामठी :– फिर्यादी सुरज सुभाष नागदेवे, वय २९ वर्षे, रा. पाण्याचे टाकीजवळ, घोरपड, कामठी, नागपूर यांनी पोलीस ठाणे नविन कामठी येथे तक्रार दिली की, त्यांची पत्नी नामे सौ. श्रेयांशी सुरेश नागदेवे, वय २३ वर्षे ही दिनांक १०.११.२०२६ चे १६.०० वा. पासुन पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीतील राहते घरून बेपत्ता झाल्या आहे. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे नविन कामठी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता महिलेचे वर्णन** रंग– गोरा, चेहरा–गोल, बांधा–मध्यम, उंची–४ फुट ५ इंच, केस–काळे लांब, अंगात– पिवळ्या रंगाचा सलवार व काळ्या रंगाचा प्लाझो घातलेले आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.



श्रेयांशी

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.